RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2013-15

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-अ

वर्ष ५, अंक २७] बुधवार, मे २२, २०१३/ज्येष्ठ १, शके १९३५ [पृष्ठे ८, किंमत : रुपये २५.००

असाधारण क्रमांक ६१

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ मे २०१३

अधिसूचना

भारतीय वन अधिनियम, १९२७.

क्रमांक एस-३०/०२/२०१३/प्र.क्र. २१/फ-६.— ज्याअर्थी, तत्कालीन मुंबई शासनाच्या महसूल विभागाने काढलेली शासकीय अधिसूचना, क्रमांक जी. एन. ४३३५/३९(ड), दिनांक १ ऑक्टोबर १९४२ द्वारे, भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १६) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या विभिन्न कलमांन्वये वन अधिकाऱ्याने करणे आवश्यक असलेल्या विवक्षित गोष्टी करण्यासाठी विवक्षित अधिकाऱ्यांना नियुक्त करून त्यांना अधिकार प्रदान करण्यात आले होते ;

आणि ज्याअर्थी, शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक आयएफए-१०६४/७११६८-झेड, दिनांक २२ नोव्हेंबर १९६६ द्वारे विवक्षित वन अपराध अभिसंधानाकरिता उक्त अधिनियमाच्या कलम ६८ च्या पोट-कलम (१) अन्वये वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, उप विभागीय वन अधिकारी आणि वनक्षेत्र अधिकारी यांना अधिकार प्रदान करण्यात आले होते ;

आणि ज्याअर्थी, सन १९७४ मध्ये विधि संस्थापित असलेले आणि विभिन्न वनीकरणाच्या प्रयोजनांसाठी विवक्षित वन जमीन आपल्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेले महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित (एफ.डी.सी.एम.लि.) यांच्या विवक्षित अधिकाऱ्यांना, शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक एफडीसी-११७४/५०३६८-दोन/कार्यासन फ-५, दिनांक ६ ऑगस्ट १९७५ द्वारे उक्त अधिनियमा-अन्वये वन अधिकाऱ्याने जे अधिकार वापरणे आवश्यक आहे, अशा विवक्षित अधिकारांचा वापर करण्यासाठी नियुक्त करण्यात आले होते ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यासाठी लागू उक्त अधिनियमांच्या कलम ६१क च्या पोट-कलम (१) च्या प्रयोजनांसाठी, शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक टीआरएस-१०८३/९१८८२ (दोन)/प्र. क्र. ८७/फ-६, दिनांक ३१ मे १९८५ द्वारे विवक्षित विभागीय वन अधिकारी, उप विभागीय वन अधिकारी, सहायक वनसंरक्षक, संलग्न अधिकारी आणि काष्ठ निष्कासन (लॉगिंग) अधिकारी यांना प्राधिकृत अधिकारी म्हणून अधिकार प्रदान करण्यात आले होते ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यासाठी लागू उक्त अधिनियमांच्या कलम ६१ग च्या प्रयोजनांसाठी शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक टीआरएस-१०८३/९१८८२(तीन)/प्र.क्र. ८७/फ-६, दिनांक ३१ मे १९८५ द्वारे, प्रादेशिक वनवृत्ताच्या प्रभारी वन संरक्षकास अधिकार प्रदान करण्यात आले होते ;

आणि ज्याअर्थी, शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक एस-३०/१०/२०००/प्र.क्र. ४५६/फ-६, दिनांक २१ एप्रिल २००१ द्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम ७२ च्या पोट-कलम (१) अन्वये वापरता येण्यायोग्य असलेले अधिकार विवक्षित वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांकडे विनिहित करण्यात आले होते आणि तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ७२ च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) मधील विनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी परिमंडळाच्या सर्व प्रभारी वनपालांकडे देखील अधिकार विनिहित करण्यात आले होते ;

आणि ज्याअर्थी, वन विभागाच्या संघटनात्मक संरचनेतील बदल आणि त्यानुषंगाने विवक्षित पदांची होणारी श्रेणीवाढ तसेच, वन अधिकाऱ्यांच्या विवक्षित पदांच्या पदनामात झालेला बदल विचारात घेता, उक्त अधिनियमाच्या विभिन्न कलमान्वये वन अधिकाऱ्याने करणे आवश्यक असलेल्या विवक्षित गोष्टी करण्याकरिता वन विभागाच्या अधिकाऱ्यांना नियुक्त करण्यासाठी आणि त्यांना अधिकार प्रदान करण्यासाठी एक नवीन अधिसूचना काढणें इष्ट आहे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र राज्यासाठी लागू भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १६) च्या कलमे २, १७, २१, २५, २६ (१) (ग), २६ (२)(क), २६ (४), ३३ (३), ३८, ४४, ४५, ४६, ४७, ५०, ५२, ५३, ५६, ५७, ६१, ६१ क, ६१ ग, ६३, ६४, ६५, ६६, ६८, ७०, ७२, ७९, ८३ आणि ८५ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि त्याबाबतीत वेळोवेळी काढलेल्या विद्यमान सर्व उपरोल्लिखित शासकीय अधिसूचनांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन याद्वारे,—

(१) पुढील तक्त्यामधील स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या वन विभागातील आणि वन महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित (एफ.डी.सी.एम.लि.) यातील अधिकाऱ्यांना स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, उक्त अधिनियमाच्या विभिन्न कलमांन्वये वन अधिकाऱ्याने करणे आवश्यक असलेल्या कोणत्याही गोष्टी करण्यासाठी नियुक्त करीत आहे :—

तक्ता

अ. क्र. (१)	अधिकारी (२)	कलमे (३)
१	मुख्य वनसंरक्षक, वनसंरक्षक, महाव्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित.	६१ग, २६ (४) आणि ३३ (३).
२	मुख्य वनसंरक्षक, महाव्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित, वनसंरक्षक, उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित, स्वतंत्र उप विभागांचे प्रभारी उप विभागीय वन अधिकारी, सहायक वनसंरक्षक, सहायक व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित.	२१, २६ (४), ३३ (३), ५३, ५६, ५७, ६५, ६८ आणि ७२.
३	मुख्य वनसंरक्षक, महाव्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित, वनसंरक्षक, उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित, स्वतंत्र उप विभागांचे प्रभारी उप विभागीय वन अधिकारी.	१७, २५, २६ (१) (ग), ३८, ४६, ४७, ५०, ६१ आणि ८३.
४	उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित, स्वतंत्र उप विभागांचे प्रभारी उप विभागीय वन अधिकारी, सहायक वनसंरक्षक, सहायक व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित, काष्ठ निष्कासन (लॉगिंग) अधिकारी, आलापल्ली, गडेगाव, नवेगाव, पुसद आणि वणी.	६१ क (१)
५	विभागीय वन अधिकारी, विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित	४४, ५२, ५३, ६१, ६४, ६५, ६८, ७०, ७२, ७९.
६	वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र अधिकारी महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित	२६ (४), ३३ (३), ५३, ५६, ५७, ६५ आणि ७२.

(१)	(२)	(३)
७	वनसर्वेक्षक, रेंजर सर्वेक्षक, वनपाल, वनरक्षक (महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यामधील वनपाल व वनरक्षक यांसह).	७२ (१) (क)
८	मुख्य वनसंरक्षक, महाव्यवस्थापक, प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित, वनसंरक्षक, उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित, स्वतंत्र उप विभागांचे प्रभारी उप विभागीय वन अधिकारी, सहायक वनसंरक्षक, सहायक व्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित, वन परिक्षेत्र अधिकारी, वनपाल, वनरक्षक (महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यामधील वन परिक्षेत्र अधिकारी, वनपाल व वनरक्षक यांसह).	२६ (२)(क), ३४,४४, ४५, ५२, ६३, ६४, ६६, ७० आणि ७९.

स्पष्टीकरण.—वरील तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांमध्ये, त्यांना समकक्ष असलेल्या, वन विभागाच्या वन्यजीव शाखेतील अधिकाऱ्यांचाही समावेश असेल. उदा. मुख्य वनसंरक्षक यामध्ये मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचा समावेश आहे.

(२) (अ) उक्त अधिनियमाच्या कलम ८५ च्या पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रश्नावर निर्णय देण्यासाठी सर्व मुख्य वनसंरक्षक, महाव्यवस्थापक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यांना प्राधिकृत करीत आहे.

(ब) उक्त अधिनियमाच्या कलम ८५ च्या पोट-कलम (२) अन्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य आणि व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यांना अपिलीय प्राधिकारी म्हणून नियुक्त करीत आहे.

(३) उक्त अधिनियमाच्या कलम २५ अन्वये राखीव वनातील सार्वजनिक किंवा खाजगी रस्ते आणि जलमार्ग बंद करण्याकरिता वन अधिकारी ज्यांच्या पूर्व परवानगीने अधिकारांचा वापर करू शकेल, असा अधिकारी म्हणून जिल्हाधिकाऱ्याला प्राधिकृत करीत आहे ;

(४) उक्त अधिनियमाची कलमे ५२, ६४ व ६६ यांच्या तरतुदींची आणि मुंबई वन नियम, १९४२ याच्या नियम ८५ ची अंमलबजावणी करण्याकरिता सीमाशुल्क, मोटार वाहन, राज्य उत्पादन शुल्क, सामाजिक वनीकरण आणि आदिवासी विकास विभाग यांमधील सर्व अधिकाऱ्यांना वन अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे ;

(५) (अ) उक्त अधिनियमाच्या आणि मुंबई वन नियम, १९४२ च्या सर्व प्रयोजनांसाठी सर्व जिल्हाधिकारी, सहायक जिल्हाधिकारी आणि उप जिल्हाधिकारी यांना, वेळोवेळी महसूल विभागाच्या व्यवस्थापनाखाली असतील अशा, त्यांच्या संबंधित अधिकार क्षेत्रातील राखीव किंवा संरक्षित वनांच्या बाबतीत वन अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे ;

(ब) उक्त अधिनियमांच्या कलम ६८ च्या पोट-कलम (३) च्या तरतुदींच्या अधीन राहून, वरील खंड (अ) मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या संबंधित अधिकारक्षेत्रातील राखीव वनाबाबत आणि संरक्षित वनाबाबत उक्त अधिनियमाच्या कलम ६८ मध्ये विनिर्दिष्ट केलेले अधिकार निहित करीत आहे ;

(क) सर्व जिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या संबंधित अधिकारक्षेत्रातील राखीव वनांबाबत आणि संरक्षित वनांबाबत उक्त अधिनियमाच्या कलम ६१ मध्ये विनिर्दिष्ट केलेले अधिकार विहित करीत आहे.

(६) उक्त अधिनियमाची कलमे ५२, ६४ आणि ६६ प्रयोजनासाठी सर्व मंडळ अधिकारी, तलाठी आणि पोलीस पाटील यांना, वेळोवेळी महसूल विभागाच्या व्यवस्थापनाखाली असतील अशा, त्यांच्या संबंधित अधिकार क्षेत्रातील वनांच्या बाबतीत वन अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे ;

(७) पुणे जिल्ह्यातील जी राखीव वन कुरणे, सेना रसद विभागाच्या उपयोगासाठी नेमून देण्यात आली असतील, अशा राखीव वन कुरणांच्या बाबतीत मुख्य सेना रसद अधिकारी, पुणे यांस, उक्त अधिनियमाच्या आणि मुंबई वन नियम, १९४२ च्या सर्व प्रयोजनांसाठी वन अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे ;

(८) पुणे जिल्ह्यातील तृण अधीक्षक, सेना रसद विभाग, पुणे आणि सेना रसद कुरण चौकीदार यांना, उक्त अधिनियमाची कलमे ५२, ६४ व ७० यांच्या प्रयोजनासाठी, त्यांची कर्तव्ये ज्या क्षेत्रापुरती मर्यादित असतील त्या संपूर्ण क्षेत्रासाठी वन अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे ;

(९) अहमदनगर जिल्ह्यातील जी राखीव वन कुरणे सैन्याच्या रिमाउंट विभागाच्या उपयोगासाठी नेमून देण्यात आली असतील, अशा राखीव वन कुरणांच्या बाबतीत समादेशक अधिकारी, रिमाउंट आगार, अहमदनगर यांस उक्त अधिनियमांच्या आणि मुंबई वन नियम, १९४२ च्या सर्व प्रयोजनांसाठी वन अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे ; आणि

(१०) अहमदनगर जिल्ह्यातील जी राखीव वन कुरणे सैन्याच्या तृणक्षेत्र विभागाच्या उपयोगासाठी नेमून देण्यात आली असतील, अशा राखीव वन कुरणांच्या बाबतीत व्यवस्थापक, सेना तृणक्षेत्र, अहमदनगर यांस, उक्त अधिनियमांच्या आणि मुंबई वन नियम, १९४२ च्या सर्व प्रयोजनांसाठी वन अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे.

स्पष्टीकरण.—या अधिसूचनेद्वारे अधिक्रमण करण्यात आलेल्या आणि उक्त अधिनियमाच्या तरतुदींखाली काढलेल्या कोणत्याही अधिसूचनांद्वारे किंवा आदेशांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून कोणत्याही अधिकाऱ्याने केलेल्या कायदेशीर कार्यवाहीच्या परिणामी, जी कोणतीही कार्यवाही सुरु असेल, अशा कोणत्याही कार्यवाहीवर, या अधिसूचनेतील कोणत्याही गोष्टीमुळे बाधा पोहोचणार नाही किंवा ती कार्यवाही संकोच पावणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

संजीव गौड,
शासनाचे सहसचिव.

REVENUE AND FOREST DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
dated the 21st May 2013.

NOTIFICATION

INDIAN FOREST ACT, 1927.

No. S-30/02/2013/CR-21/F-6.—Whereas by the Government Notification, Revenue Department, No. G.N. 4335/39(*d*), dated the 1st October 1942 issued by the then Government of Bombay, certain officers were empowered and appointed to do certain things required to be done by a Forest-Officer under various section of the Indian Forest Act, 1927 (XVI of 1927) (hereinafter referred to as 'the said Act') ;

And whereas, by the Government Notification, Revenue and Forests Department, No. IFA. 1064/71168-Z, date the 22nd November 1966, the Conservator of Forests, Divisional Forest Officers, Sub-Divisional Forest Officers and Range Forest Officers were empowered under sub-section *(1)* of section 68 of the said Act to compound certain forest offences ;

And whereas, by the Government Notification, Revenue and Forests Department, No.FDC1174/50368-II/Desk-F-5, date the 6th August 1975 certain officers of the Forest Development Corporation of Maharashtra Limited (FDCM Ltd.) which is incorporated in the year 1974 and has certain forest land under its administrative control for various forestry purposes, were appointed to exercise various powers required to be exercised by a Forest-Officer under the said Act ;

And whereas, by the Government Notification, Revenue and Forests Department, No. TRS. 1083/91882(ii)/CR-87-F6, dated the 31st May 1985, certain Divisional Forest Officers, Sub-Divisional Forest Officers, Assistant Conservator of Forests, Attached Officers and Logging Officers were empowered for the purposes of sub-section *(1)* of section 61 A of the said Act as Authorised Officers, in its applications to the State of Maharashtra ;

And whereas, by the Government Notification, Revenue and Forests Department, No. TRS. 1083/91882(iii)/CR-87-F6, dated the 31st May 1985, the Conservator of Forests, in charge of territorial circles were empowered for the purposes of section 61C of the said Act in its application to the State of Maharashtra ;

And whereas, by the Government Notification, Revenue and Forests Department, No. S.30/10/2000/C.R.456/F-6, dated the 21st April 2001, certain Range Forest Officers were invested with the powers exercisable under sub-section *(1)* of section 72 of the said Act, and all foresters in charge of a round were also invested with the powers for the purposes specified in clause *(a)* of sub-section *(1)* of section 72 of the said Act ;

And whereas, in view of change of the organizational structure of the Forest Department and consequent up-gradation of certain post and change of designations of certain posts of Forest Officers, it is expedient to issue a fresh notification to empower and appoint the Officers of Forest Department to do certain things required to be done by a Forest-Officer under various sections of the said Act.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sections 2, 17, 21, 25, 26(1)(c), 26(2)(a), 26(4), 33(3), 38, 44, 45, 46, 47, 50, 52, 56, 57, 61, 61A, 61C, 63, 64, 65, 66, 68, 70, 72, 79, 83 and 85 of the Indian Forest Act, 1927 (XVI of 1927), in its application to the State of Maharashtra, and of all other power enabling it in that behalf, and in supersession of all above mentioned existing Government Notifications, issued from time to time in this behalf, the Government of Maharashtra is hereby pleased.—

(1) to empower, appoint and authorise the following officers of the Forest Department and Forest Development Corporation of Maharashtra Limited (FDCM Ltd.) mentioned in column (2)

of the Table appended here to to do anything required to be done by a Forest-officer under the various sections of the said Act specified against them in column (3) of the table.

TABLE

Sr. No. (1)	Officers (2)	Sections (3)
1.	Chief Conservators, Conservators, General Managers, Regional Managers, FDCM Ltd.,	61C, 26(4) and 33(3)
2.	Chief Conservators, General Managers, Regional Managers, FDCM Ltd., Conservators, Deputy Conservators, Divisional Forest Officers, Divisional Managers, FDCM Ltd., Sub-Divisional Forest Officers in charge of independent sub-Divisions, Assistant Conservators, Assistant Managers, FDCM Ltd.	21, 26(4), 33(3), 53, 56, 57, 65, 68, and 72
3.	Chief Conservators, General Managers, Regional Managers, FDCM Ltd., Conservators, Deputy Conservators, Divisional Forest Officers, Divisional Mangers, FDCM Ltd., Sub-Divisional Forest Officers in Charge of independent Sub-Divisions.	17, 25, 26(1)(c), 38, 46, 47, 50, 61 and 83.
4.	Deputy Conservators, Divisional Forest Officers, Divisional Managers, FDCM Ltd., Sub-Divisional Forest Officers in charge of independent Sub-Divisions, Assistan Conservators, Assistant Managers, FDCM Ltd., Logging Officers Allapalli, Gadegaon, Navegaon, Pusad and Wani.	61 A (1)
5.	Divisonal Forest Officers, Divisional Managers, FDCM Ltd.	44, 52, 53, 61, 64, 65, 68, 70, 72, 79.
6.	Range Forest Officers, FDCM Ltd.	26(4), 33(3), 53, 56, 57, 65 and 72.
7.	Forest Surveyors, Ranger Surveyors, Foresters, Forest Guards (including Foresters and Forest Guards in FDCM Ltd.)	72 (1) (a)
8.	Chief Conservators, Chief General Manager, General Managers, Regional Managers FDCM Ltd., Conservators, Deputy Conservators, Divisonal Forest Officers, Divisional Managers FDCM Ltd, Sub-Divisional Forest Officers in charge of independent Sub-Divisions, Assistant Conservators, Assistant Managers, FDCM Ltd., Range Forest Officers, Foresters and Forest Guards (Including Range Forest Officers, Foresters and Forest Guards in FDCM Ltd.)	26 (2) (A), 34, 44, 45, 52, 63, 64, 66, 70 and 79.

Explanation :—The Officers mentioned in Column 2 in the Table above will also include their counterparts in Wildlife Wing of the Forest Department, *e.g.* Chief Conservator includes Chief Conservator (Wildlife);

(*2*) (*a*) to authorize all Chief Conservators, General Managers, FDCM Ltd., to decide questions referred to in sub-section (*2*) sections 85 of the said Act;

(*b*) to appoint the Principal Chief Conservator of Forests (Head of Forestry Force), Maharashtra State and the Managing Director, FDCM Ltd., to be the appellate authority under sub-section *(2)* section 85 of the said Act;

(*3*) to authorize District Collector, to be the officer with whose previous sanction the Forest-officer should exercise the powers under section 25 of the said Act to stop public or private ways and water courses in reserve forests;

(*4*) to appoint all officers of Customs, Motor Vehicles, State Excise, Social Forestry and Tribal Development Departments to be Forest-officers for the purpose of carrying out the provisions of sections 52, 64 and 66 of the said Act and rule 85 of the Bombay Forest Rules, 1942;

(*5*)(*a*) to appoint all Collectors, Assistant Collectors and Deputy Collectors to be Forest-officers for all the purposes of the said Act and the Bombay Forest Rules, 1942, with respect to such reserved or protected forests within the limits of their respective jurisdiction, as may, from time to time, be under the management of the Revenue Department;

(*b*) subject to the provisions of sub-section (*3*) of section 68 of the said Act, to invest the officers, mentioned in clasue (*a*) with the power specified in section 68 of the said Act, with respect to reserved and protected forests within the limits of their respective jurisdiction;

(*c*) to invest all Collectors with the power spcified in section 61 of the said Act, with respect to reserved and protected forests within the limits of their respective jurisdiction;

(*6*) to appoint all Circle Inspectors, Talathis and Police Patels to be Forest-officers for the purposes of section 52, 64 and 66 of said Act, with respect to such forests within the limits of their repective jurisdiction, as may, from time to time be under the management of Revenue Department;

(*7*) to appoint the Chief Commissariat officer, Pune to be a Forest-officer for all the purposes of the said Act and the Bombay Forest Rules, 1942 in respect of the reserved forest kurans in the Pune District which have been assigned for the use of Commissariat Department;

(*8*) to appoint the Superintendent of Grass Operations, Commissariat Department, Pune and the Commissariat Kurans Chaukidars in the District of Pune, to be Forest-officers throughout the areas to which their duties extend for the purposes of sections 52, 64 and 70 of the said Act;

(*9*) to appoint the Officer Commanding, Remount Depot, Ahmedngar to be a Forest-officer for all the purposes of the said Act and the Bombay Forest Rules, 1942 in respect of the reserved Forest Kurans in the Ahmednagar District which have been assigned for the use of the Army Remount Department; and

(*10*) to appoint the Manager, Military Grass Farms , Ahmednagr to be a Forest-officer for all the purposes of the said Act and Bombay Forests Rules, 1942 in respect of the reserved Forest Kurans in Ahmednagar District which have been assigned for the use of the Military Grass Farms Department.

Explanation—Nothing in this notification shall affect or abridge any proceeding which is in progress as a consequence of lawful actions taken by any officer in accordance with the powers conferred by any of the notifications or orders issued under the provisions of the said Act, which are superseded by this Notification.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJEEV GAUR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.